## प्रकरण दुसरे

# 'तिसऱ्या पिढीतील कविता आणि डी.बी. रत्नाकर'

- प्रस्तावना

१) मराठी दलित कविता.

२) दलित कवितेची वाटचाल.
   २.१) दलितांची पारंपरिक शाहिरी.
   २.२) दलितांची सत्यशोधकी शाहिरी.
   २.३) आंबेडकरी शाहिरी.

३) स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कविता.
   ३.१) दुसऱ्या पिढीची दलित कविता.
   ३.२) तिसऱ्या पिढीतील दलित कविता.

४) धम्मपाल रत्नाकर यांची कविता
- सारांश
- निष्कर्ष
- संदर्भ सूची

-----

# प्रकरण दुसरे
# तिसऱ्या पिढीतील कविता आणि डी.बी. रत्नाकर

साठच्या दशकात मराठीमध्ये आलेल्या दलित साहित्य प्रवाहामध्ये प्रामुख्याने कविता मोठ्या प्रमाणात लिहिली गेली. अभिव्यक्तिचे सरळ आणि सोपे माध्यम म्हणून ही निर्मिती लक्षणिय आहे. तिसऱ्या पिढीपर्यंतची दलित कवितेची वाटचाल ही जितकी महत्त्वाची आहे तितकेच तिचे ऐतिहासिकत्वही महत्त्वाचे आहे. म्हणून दलित कवितेचा विचार करत असताना तिचा ऐतिहासिक टप्पा पाहूनच पुढे जावे लागते. दलित कवितेची जडण घडण कशी झाली याचा स्थूल विचार करून कवी डी.बी. रत्नाकरांच्या कवितेकडे वळता येईल.

## १) मराठी दलित कविता :

दलित कविता हा दलित साहित्यप्रांतातील महत्त्वाचा घटक आहे. मुळातच डॉ.बाबासाहेबांच्या लढ्यांतून, तत्त्वज्ञानातून ती निर्माण झाल्याने या कवितेने किंवा एकूणच दलित साहित्याने, आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे. डॉ. बाबासाहेबांच्या विचाराने दलित कवितेला विद्रोही रूप दिले. म्हणून ही कविता इथल्या व्यवस्थेविरोधी बोलण्याचे धाडस करू लागली. मुळात दलित कविता ही अनेक वर्षाचा कोंडलेला श्वास आहे. वेदनेचा हुंकार आहे. डॉ. भालचंद्र फडके म्हणतात त्याप्रमाणे, ''दलित कविता ही एक ऐतिहासिक घटना होती, त्यांच्या जीवनात काही अर्थ उरला नव्हता आणि ज्यांच्याजवळ अर्थपूर्ण अनुभव होता. त्यांना भाषा नव्हती, त्यांचा आवाज येथील समाजव्यवस्थेने दडपला होता. अशा अभावग्रस्त समाजाची जेव्हा शब्दांशी सोयरीक झाली, स्वतंत्र देशात त्यांना अभिव्यक्तिची सनद मिळाली, त्यातून आपले जीवन व आपली समाजव्यवस्था नव्याने मांडू पाहणारा दलित कवी निर्माण झाला. तो येथील धर्मसत्ता, अर्थसत्ता,नीतीकल्पना, संस्कृती, साहित्यकल्पना इत्यादी सगळ्यावर घाव घालीत होता.''[१]

डॉ. फडके म्हणतात त्याप्रमाणे दलित कविता ही युगान युगाच्या दडपलेल्या भावनांचा अंत:स्फोट आहे. हा स्फोट घडविण्यासाठी दलित लेखकांना कविता हा रूपबंध सोपा वाटल्याने या प्रकारात पुष्कळ निर्मिती झाली. दलित कविता ही आंबेडकरी विचार शब्दा-शब्दातून मांडू लागली. तिला विद्रोहाची धार आली. दलित कवितेच्या निर्मितीविषयी प्रा. रा.ग. जाधव म्हणतात, ''दलित साहित्याचा जन्म स्वातंत्र्याच्या गर्भातून झाला. तीव्र भावना, उत्कट जाणिवा या नेहमीच काव्य भाषेतून

प्रथम व्यक्त होतात आणि स्वातंत्र्याच्या जाणिवेइतकी तीव्रोत्कट जाणीव दुसरी कोणती असू शकेल ? दलितांना ज्यावेळी पुरातन काळापासूनच्या प्रखर पारतंत्रतेची तीव्र कल्पना आली नि त्या परतंत्रतेचा नि:पात करण्याची अनावर पण न्याय्य आकांक्षा स्फुरली त्यावेळी पहिला उद्गार काव्यभाषेतूनच उमटला.''[२]

प्रा. रा.ग. जाधवांच्या मताप्रमाणे दलित साहित्याचा जन्मच मुळात पारतंत्र्य, गुलामगिरी यांच्या तीव्र निषेधातून झालेला आहे. हा निषेध व्यक्त करण्यासाठी कथा, कादंबरीपेक्षा कविता हे माध्यमच उत्तम होते. कमी शब्दात जास्त आशय मांडण्यासाठी कविता हा प्रकार योग्य असल्याने दलित लेखकांनी कविता हाच रूपबंध प्रथम स्वीकारला व याच प्रकारातून वेदना, विद्रोह, प्रभावीपणे मांडला. म्हणून दलित साहित्यातील एक महत्त्वाचा वाङ्मयप्रकार म्हणून कवितेकडे पाहता येते.

## २) दलित कवितेची वाटचाल :

१९६० नंतर खऱ्या अर्थाने खळबळ निर्माण करणारी दलित कविता म्हणजे सनातन दंभावर, आत्मगौरवावर पोसणाऱ्या प्रस्थापित साहित्याला आव्हान म्हणून उभी राहिली. प्रस्थापित मराठी भाषेचे जुने आकृतिबंध दलित कवितेने दूर सारले. साहित्य निर्मितीला एक नवा तोंडवळा, वेगळी आशय घनता आणि अभिव्यक्तीचे निराळे स्वरूप आणून आपले एक नवे आणि स्वतंत्र विश्व निर्माण केले. दलित कवितेची वाटचाल पाहत असताना आंबेडकरपूर्व काळापासून पाहावी लागेल.

काही दलित समीक्षकांनी संत चोखामेळ्याच्या अभंग काव्यात दलित कवितेची बीजे शोधली आहेत. हरीश खंडेराव यांनी ''दलित जाणिवेचा, संवेदनांचा पहिला हुंकार संत अभंग काव्यात जाणवतो व प्रामुख्याने विद्रोही विचारसरणी संत चोखामेळ्यापासून अस्तित्वात आल्याचे दिसून येते.''[३] असे प्रतिपादन केलेले आहे. मात्र हरीश खंडेराव यांचे हे मत योग्य आहे असे वाटत नाही. कारण संत चोखामेळ्याच्या अभंगात जरी विद्रोह असला तरी तो विद्रोह तत्कालीन प्रस्थापित वर्तुळाला भेदू शकलेला नाही. संत चोखोबांच्या अभंगाचे स्वरूप सांगताना डॉ. कृष्णा किरवले म्हणतात, ''वस्तुत: चोखामेळा यांच्या अभंगातील आशय विषय हे सामान्यत: त्यांच्या काळातील दु:ख मांडतात. मात्र त्यांचे नाते आजच्या दलित जाणीवेच्या दलित साहित्याशी जोडणे योग्य नाही.''[४] कारण चोखामेळ्याची जाणिव आणि दलित जाणीव यात निश्चितच अंतर आहे. ''चोखोबाच्या जाणिवेत स्वयं प्रयत्नाने दु:ख निवारण्याची ताकद दिसत नाही. त्यासाठी त्यांना आध्यात्माचा आधार

हा घ्यावाच लागतो. म्हणून डॉ. किरवले पुढे म्हणतात की, चोखामेळा पांरपरिक व्यवस्थेपुढे शरणागती स्वीकारतो व अशी शरणागत अवस्था दलितांच्या उत्थानासाठी मारक ठरणारी असल्याचे प्रतिपादन आहे. करीता दलित साहित्याच्या पूर्वपरंपरेचा विचार करताना चोखामेळा व दलित साहित्य यातील अंतर विचारात घेणे आवश्यक ठरते.''[५] डॉ. किरवलेच्या या मतावरून असे दिसते की, संत चोखोबाच्या अभंगात परिवर्तनाचा विचार येत नाही. तर त्यांचा विद्रोह हा परिस्थितीला शरण जाताना दिसतो. म्हणूनच विद्रोहाचा पहिला हुंकार किंवा बीजे ही चोखोबांच्या अभंगात सापडतात हे हरीश खंडेराव यांचे मत योग्य वाटत नाही. सुधारणा युगामध्येही काही समीक्षक केशवसुतांच्या 'अंत्यजाच्या मुलाचा पहिला प्रश्न' (१८८८) या काव्योद्‌गाराकडे पाहतात. पण श्री.म. माटे, श्री. कृ. कोल्हटकर, मामा वरेरकर, प्रबोधनकारक ठाकरे, यांच्याही साहित्यकृतीतून अस्पृश्यता निवारण, अस्पृश्योद्धार असे विषय येत होते. मात्र हे सर्व दलितांच्यावरील सहानुभूतीतून लिहिले गेलेले साहित्य दिसते. गांधीवादाच्या प्रेरणेतून लिहिल्या गेलेल्या या साहित्यामध्ये आंबेडकरी सम्यक क्रांतीचे अधिष्ठान नव्हते. त्यामुळे दलित कवितेची बीजे या साहित्यात शोधण्यापेक्षा ती दलित शाहिरीत शोधणे अधिक योग्य ठरते.

## २.१ दलितांची पारंपरिक शाहिरी :

दलित कवितेचा पाया मजबूत करण्यासाठी दलित कवितेला लाभलेली एक महत्त्वपूर्ण परंपरा दलित शाहिरीची आहे. दलित शाहिरीने आपल्या अनेक वैशिष्ट्यांनी मराठी सारस्वतात आपले स्थान निर्माण केलेले आहे. तळागाळातील या शाहिरांच्याकडे समृद्ध जीवनानुभव होते. त्यांच्या रचनांतून हे दिसून येते. शाहिरी हा या शाहिरांच्या जीवनाचाच एक भाग होता. दलितशाहिरांनी रंजनाच्या माध्यमातूनच जनजागरणाची भूमिका मांडली व पुढची दलित कविता याच पायावर उभी राहिली. डॉ. कृष्णा किरवले यांनी शाहिरी काव्याचे तीन विभाग केलेले आहेत.

१) पांरपरिक मराठी शाहिरीचे अनुकरण करणारी रचना.

२) सत्यशोधक चळवळीचा प्रभाव घेऊन रचलेली कवने.

३) डॉ.बाबासाहेबाच्या विचार, शिकवणुकीतून निर्माण झालेली प्रबोधनकारी रचना.

मराठीतील दलितांनी लिहिलेली पारंपरिक शाहिरी विपूल प्रमाणात आहे. या शाहिरीला तत्कालीन सामाजिकतेचा रंग होता. रोख ठोक सवाल करण्याची ताकद होती. "१८१८ पूर्वी लिहिलेला 'संतूमहारा'चा 'खर्ड्याच्या लढाईवरील पोवाडा' हा दलित शाहिरीचा उपलब्ध झालेला पहिला पोवाडा होय."[६] यानंतर आद्यवगनाटककार 'उमा बापू मांग' (१८६०), 'मोहनाबटाव' तात्याबापूरावू मांग, शिवा संभा कवलापूरकर, अर्जुन वाघोलीकर, हरिभाऊ वडगावकर, भाऊ बापू मांग नारायणगावकर, शाहीर भाऊ फक्कड, किसन कुसगावकर आदींनी विपुल शाहिरी लिहिली. या पारंपरिक शाहिरीचे स्वरूप हे मराठी शाहिरीच्या तोंडवळ्यांशी मिळते जुळते होते. या ही शाहिरीची सुरुवात गणेश स्तवनानेच होत होती. १९व्या शतकातील वरील शाहिरांनी या प्रकारातच शाहिरी लिहिलेली दिसते. एकूण काय तर भक्ताचे सर्व मनोरथ पूर्ण करण्यासाठी गणेशाला प्रसन्न करून संकटाचे निवारण करावे अशी ह्या शाहिरांची समजूत होती. नंतरच्या काळात मात्र हे 'गणेशस्तवन' मागे पडलेले दिसते. रंजनाच्या पातळीवर वावरणारी ही शाहिरी सामाजिक व्यंगावर सुद्धा प्रहार करत होती. या शाहिरांच्या कल्पनेची भरारी मोठी होती. डॉ. किरवले या पारंपरिक शाहिरीवर भाष्य करताना म्हणतात, "रंजनाच्या माध्यमातून धार्मिक, सामाजिक, राजकीय विकृतीवर आघात करण्याची आणि समाजाला वास्तवाभिमुख बनविण्याची शाहीर व तामशाची अंत:प्रेरणा निश्चित 'दलित जाणिवे'ला जवळची आहे."[७] कारण ही शाहिरी अध्यात्मिक अनुभूतीत गुंतवण्यापेक्षा समाजाला वास्तवाचा पायाभूत आधार देताना दिसते. यांची प्रचिती सत्यशोधकी जलसे तसेच आंबेडकरी विचारांच्या शाहिरीमध्ये दिसून येते.

## २.२ दलितांची सत्यशोधकी शाहिरी :

महात्मा फुल्यांच्या सत्यशोधकी विचारांनी शाहिरी वाङ्मयाच्या आकृतीबंधातच अमुलाग्र बदल झाला. सामाजिक स्वातंत्र्याच्या पायाभरणीसाठी हिंदूच्या विषमताधिष्ठित चातुवर्ण्यावर महात्मा फुल्यानी आसूड ओढले. "मानवाचे धर्म नसावे अनेक" असा मूलगामी विचार घेऊन ही शाहिरी अवतीर्ण झाली.

पेशवाईच्या अस्तानंतर इंग्रजी राजवटीत, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनात मूलगामी परिवर्तन झाले. याच नवजागरणाच्या काळात म.फुले यांचा सामाजिक क्षेत्रात झालेला उदय शुद्रातीशुद्र, बहुजन शेतकरी, स्त्रिया यांच्या उत्थानासाठी मोलाचा ठरला. त्यांनी विचाराला दिलेली

कृतीची जोड ही समाज परिवर्तनाला पोषख ठरली. त्यासाठी त्यांनी 'सत्यशोधक समाजा'ची केलेली स्थापना व त्याच्या विचार प्रसारासाठी निर्माण केलेली शाहिरी, अखंडादी रचना ह्या समाजाभिमुख आशय आणि विषय घेऊन आल्या. त्यामुळेच पारंपरिक शाहिरीतील रंजनाला फाटा देऊन केवळ प्रबोधनाचे माध्यम म्हणून या कलेला म. फुल्यांनी परावर्तीत केले. या परंपरेने बहुजन समाजातून सामाजिक नेतृत्व करणारी परंपरा निर्माण केली. केशवराव जेधे, जवळकर, कृष्णराव भालेकर, मुकुंदराव पाटील, भीमराव महामुनी, ताराबाई शिंदे, त्याचप्रमाणे दलित समाजातील नेतृत्वकर्ता वर्ग, गोपाळबाबा वलंगकर, शिवराम जानबा कांबळे, किसन फागू बनसोडे इ. नावे नमूद करावी लागतात.

पुढे गोपाळबाबा वलंगकरांची अखंड रचना व ब्रिटिश सरकारला अस्पृश्यांच्या मागण्याचे त्यांनी दिलेले निवेदन शिवराम जानबा कांबळे यांचे तत्कालीन दलिताच्या समस्यांशी निगडीत वृत्तपत्रातले परखड लेखन, किसन फागू यांची कविता व 'सनातन धर्माचा पंचरंगी तमाशा' तसेच वृत्तपत्रीय आणि संपादकीय लेखन हे या संदर्भात महत्त्वाचे ठरले.

डॉ. आंबेडकरांच्या उदयापूर्वी महात्मा फुल्यांच्या विचाराने प्रभावित झालेले हे दलित कलावंताचे साहित्य मराठीतील दलित साहित्याचे पूर्वरूप म्हणून अत्यंत महत्त्वाचे आहे. डॉ. कृष्णा किरवले म्हणतात त्याप्रमाणे, ''पारंपरिक शाहिरी व तमाशाचा आकृतिबंध जसाच्या तसा स्वीकारून त्यात सामाजिक प्रश्नांचा आशय भरून पारंपरिक व्यवस्थेच्या विरोधात प्रथम विद्रोहाचे रणशिंग फुंकले ते या दलित सत्यशोधकी शाहिरी आणि सत्यशोधकी तमाशानेच.''[८] याचे कारण असे की दलितांच्या सत्यशोधकी 'तमाशाने' अथवा शाहिरीनेच दलित साहित्याला 'विद्रोही जाणिवे'ची पूर्वकल्पना दिली. मात्र महात्मा फुल्यांच्या निधनानंतर ही चळवळ नेतृत्वा अभावी अस्तगंत झाली आणि सांस्कृतिक परिवर्तनाचे चक्र थांबले. मात्र आंबेडकरांच्या उदयानंतर आलेल्या शाहिरी कवितेने ते पुढे चालू ठेवले.

## २.३ आंबेडकरी शाहिरी :

आंबेडकरी शाहिरी ही १९२० नंतर उदयाला आलेली आहे. १९२० मध्ये आंबेडकरांचा भारतीय, राजकीय, सामाजिक, पटलावर उदय झाला आणि सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक क्षेत्रात मोठ्या उलथापालथी झाल्या. डॉ. आंबेडकरांचा उदय ही एक महत्त्वाची सामाजिक सांस्कृतिक घटना होय.

डॉ. बाबासाहेबाच्या उदयाने दलित समाजामध्ये जे मन्वंतर घडले तेच दलित शाहिरीतून आविष्कृत झाले. बाबासाहेबानी केलेली बंडखोरी नव्या रूपाने ही शाहिरी गाऊ लागली. "मी नवी कहाणी होऊन वाणी गाते भीमाची गाणी मी नवी कहाणी" (वामनकर्डक) असे म्हणून ती अवतरली. पारंपरिक शाहिरीतील 'गणपती स्तवन' या शाहिरांनी नाकारले व तिथे आंबेडकरांचे स्तवन आले. याचे कारणच मुळात असे की, डॉ. आंबेडकरांच्या मनावर बौद्ध तत्त्वज्ञानाचा संस्कार, त्यांच्या भौतिकवादी दृष्टीकोन विषमतावादी समाजव्यवस्था नाकारून संविधानाच्या माध्यमातून मानवी मूल्यांचा त्यांनी केलेला अंगीकार. त्यातून उपेक्षित दलित वर्गाला त्यांनी मिळवून दिलेले आत्मभान, दलितांच्या आत्मजागृतीसाठी उभारलेली चळवळ आणि भारताच्या सामाजिक आणि सांस्कृतिक बदलाची केलेली भक्कम पायाभरणी, या सर्वांमुळेच दलित समाज जागा झाला व त्याने स्वत:ला चळवळीत झोकून दिले. ही चळवळ गतिमान करण्यासाठी जी साहित्य आणि कला निर्मिती झाली त्यातूनच आंबेडकरी शाहिरीचा उदय झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांच्यात विद्रोहाची प्रखर आग पेटवून त्यांना क्रांती सन्मुख केले. ती आग तुफानाने किंवा वादळवारा, पाऊसधारा यांनी सुद्धा विझणार नाही असा आत्मविश्वास आंबेडकरी शाहिरांनी व्यक्त केलेला आहे. विशेषत: आंबेडकरी शाहीर हे 'तमाशा' या कलाप्रकाराशी निगडीत आहेत. ते कलावंत आहेत. मात्र महात्मा फुले निर्मित जलसा व शाहिरी लिहिणारे किसन फागू व गोपाळबाबा वलंगकर हे तमाशाशी संबंधित नव्हते. शाहिरांचा शाहीर भाऊ फक्कड हे शिवा-संभा कवलापूरकर यांच्या तमाशात काम करत होते. त्यांची 'भीमरावांची सायकल' ही रचना भटशाही आणि गांधीवादी राजकारणाचे विडंबन करणारी व विद्रोहाचे ज्वालाग्राही रूप कसे असते हे दाखविते. नंतर भीमराव कर्डक, केरूबुवा गायकवाड, पतितपावनदास, शाहीर पांडूरंग वनमाळी, शाहीर अढांगळे, शाहीर श्रीधर, शाहीर घेगडे, राजानंद गडपायले, वामनदादा कर्डक अशा असंख्य दलित शाहिरांनी हा शाहिरीचा प्रांत समृद्ध केला आहे. दलित शाहिरांनी जातीय दृष्टिकोणाविषयी आणि उच्चभ्रूंच्या मतलबीपणाविषयी जसा नकार प्रकट केला आहे तसाच अस्पृश्यांच्या परंपरागत जीवनाविषयीसुद्धा प्रांजळपणे नकार व्यक्त केला आहे. या शाहिरांनी शिक्षणाचे महत्त्व प्रतिपादिले. हे करत असताना माझा स्वाभिमान गहान न टाकता ताठपणेच हे मी मिळविणार आहे. त्यासाठी मोडेल, तुटेल पण वाकणार नाही. अशा जोशात ही शाहिरी अवतरली. म्हणूनच डॉ. कृष्णा किरवले यांचे मत योग्य वाटते. "मानव मुक्तीसाठी उभारलेल्या दलित चळवळीचे शाहिरी हे एक अंग आहे."[९] याचे कारणच असे की,

दलित चळवळ लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी दलित शाहिरांनी आंबेडकरी विचारांचे अनुबंध स्वीकारुनच रचना कलेली आहे.

दलित कलावंतांनी लिहिलेली शाहिरी ही प्रचार आणि प्रसारासाठी लिहिली असली तरी तिची वाङ्मयीन गुणवत्ता मात्र कमी होत नाही. वास्तवतेचे भान आणि अस्पृश्यांच्या समस्यांची अचूक जाण यांच्या पायावर ही शाहिरी उभी आहे. आंबेडकरांच्या विचारातील विद्रोहाला आणखी प्रज्वलित करण्याचे काम या आंबेडकरी शाहिरांनी केलेले आहे.

पुढे १९६० नंतर मराठीत उदय पावलेल्या 'दलित कवितेचा' पाया घालण्याचे महत्त्वाचे काम या आंबेडकरी शाहिरांनी आणि त्यांच्या कवनानी केले. मात्र जसे म. फुल्यांच्या निधनानंतर सत्यशोधकी जलसे थांबले तसेच डॉ. आंबेडकरांच्या महापरीनिर्वाणानंतर ही शाहिरी क्षीण झाली आणि नव्या रूपाने दलित कविता उदयास आली.

### ३) स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कविता :

शाहिरी काव्याची परंपरा पाठीवर घेऊन आंबेडकरांच्या प्रेरणेने दलित कविता उदयास आली. प्रस्थापित रूढ मराठी कवितेपेक्षा ही जाणीव वेगळी होती. कारण व्यापक आयुष्याच्या ओढघस्तीची तिची जानपहचानच कमी होती. पाण्यासाठी प्राण कंठात येण्याचा तिला अनुभव नाही. सांगावा घेऊन फिरण्याची कळ नाही किंवा लाकडे फोडण्याचे घट्टे नाहीत. मागे लागलेल्या कुत्र्यांना वारतानाची भीती कधी पाहिली नाही. घरातील आया बहिणींवरले भाकरी चाकरीसाठी झालेले नेहमीचे अब्रुवरील अतिक्रमण सहनलेले नाही. म्हणून प्रस्थापित मराठी कवितेपेक्षा दलित कविता वेगळी आहे. 'स्वतंत्रतेचे रेडीमेड स्तोत्र' गाणे तिला गैरलागू वाटते. कारण जयजयकार करण्यासारखे महन्मंगल, शिवास्पद व शुभद रूप पिढीताला एकदाही दिसले आणि जाणवले नाही. म्हणूनच दलित कविता ही तळागाळातील समाजाच्या आवाजाचे वाङ्मय रूप आहे. दलित कवितेने दलित, पददलित समाजाच्या भावभावनांचे पदर उलगडलेले आहेत. म्हणून तर दलित कविता ही दलितांच्या जगण्याशी, त्यांच्या दैनंदिन व्यवहाराशी निगडीत आहे.

दलित कविता स्वातंत्र्याच्या वैफल्यातून निर्माण झालेली असली तरी दलित कविता केवळ अन्याय, अत्याचाराबद्दल आक्रोश करीत नाही. ती प्रकाश युगात प्रवेश करणारी असल्याने आपल्या समाजांचे उज्ज्वल भवितव्य रेखाटते.

''सामाजिक परिवर्तनाचा वारसा घेऊनच
तुला चालणे अनिवार्य आहे,
कारण तुझ्या भोवताल
भीती प्रद वाटणाऱ्या सामाजिक विषमतेची तटबंदी
नव्याने उभारू लागले आहेत
येथले नवे मनू.... अधिक धूर्त.... विशेष तयार'' (देवेंद्र खंडारे)

दलित कविता ही एकट्याची नाही, ती समाजाची आहे. म्हणूनच सामाजिक जाणिव तिला आपल्यातून वगळता येत नाही. ही जाणिव घेऊनच नव्या दमाने आणि जोमानेच पुढे जावे लागेल अन्यथा दलिताच्या जगण्याला अनेक अडथळे येणार आहेत. दलित कविताही दलितांच्या चळवळीतून जन्माला आलेली आहे. वास्तवता आणि सामाजिकता ही तिची महत्त्वाची दोन अंगे आहेत. दलित कवींची सृजनशीलता ही त्यांच्या खोल अनुभूतीतून आलेली आहे. म्हणूनच ती मानवी मूल्ये जतन करताना दिसते, प्रकाश पूजताना दिसते, तशी ती क्रांती घडविताना दिसते. म्हणून दलित कविता ही अंधार यात्रीक होण्याचे नाकारते व दलित समाजाला प्रकोशोन्मुख करते. दलित कवीची मानसिकताही अस्पृश्यतेच्या जाणिवेतून घडलेली आहे. म्हणून बाबुराव बागुल म्हणतात, ''जसा आफ्रिकेतील, अमेरिकेतील शोषित व गुलाम झालेल्या काळ्या कवीला गोरा माणूस आपला शत्रू वाटतो, तशीच अस्पृश्य समाजातील कवींना सवर्ण समाजाची संस्कृती व संस्कृतीतून पोसलेली जीवनमूल्ये निषिद्ध वाटतात. दलित कविता म्हणून तिचे आत्मप्रकटन व आत्मरेखाटन दलित अस्मितेने दलित जाणिवेतून व आत्मशोधाच्या अंगाने होत राहते.''[१०] बहुतांशी दलित कविताही दलितांच्या संघर्षमय लढ्यातून निर्माण झालेली आहे. दलित कवींना ते आपल्या लढ्याचे साधन आणि शस्त्र वाटते. म्हणूनच तो इथले अन्याय अत्याचार शब्दांतून मांडतो व इथल्या व्यवस्थेचा धिक्कार करतो.

''हे महाकवे,
तुला महाकवीतरी कसे म्हणावे ?
हा अन्याय अत्याचार, वेशीवर टांगणारा
एक जरी श्लोक तू रचला असतास......
...... तर तुझे नाव काळजावर कोरून ठेवले असते.''[११]

हजारो वर्षे इथल्या दलितांच्यावर अन्याय होतो आहे. तरीही तुम्हाला तो दिसू नये. आमच्या समाजाचं एखादं दु:ख, एखादी साधी वेदना जरी तुम्ही लिहिली असती तर आम्ही तुम्हाला कवी म्हटले असते, हजारोवर्षांच्या दु:ख वेदना ह्या जशाच्या तशा अवस्थेत खदखदत राहिल्या आहेत. म्हणूनच दया पवारांना प्रस्थापितांचा निषेध नोंदवायचा आहे. दलित कविताही मुळातच शतकानुशतकांच्या दु:ख दारिद्रय, अत्याचार यातून आलेली आहे. ती व्यवस्थेला नाकारताना विद्रोहाचे ज्वलजहाल रूप घेऊन येते. या विद्रोहाचा आविष्कार दुसऱ्या पिढीच्या कवितेत प्रकर्षाने जाणवतो.

## ३.१ दुसऱ्या पिढीची दलित कविता:

१९६० नंतरच्या कालखंडात बाबासाहेबाच्या प्रगल्भ विचारांच्या बैठकीचे अधिष्ठान दलित कवितेला मिळाले. त्यामुळे ही कविता सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक, शैक्षणिक इ. गोष्टीवर प्रखर हल्ला चढवू लागली. तशीच ही कविता कठोर आत्मपरीक्षणालाही सामोरे गेली. दलित कविता ही वेशी बाहेरून थेट गावात आली आणि हजारो वर्षे सडत कुजत माणसे कशी जगतात याचे वास्तव चित्रण केले. बहि:ष्कृत जाती जमातींचे अनेक स्तर त्यांचे होणारे शोषण त्या त्या सामाजिक स्तरांवर वास्तव रूपात प्रकट केले. प्रस्थापित साहित्याने आजपर्यंत उपेक्षित ठेवलेल्या समाजाला डॉ. आंबेडकरांच्या क्रांतीगर्भ विचारांनी जसे 'स्व' गवसले. तोच पाया घेऊन अनेक वर्षे मूक राहिलेल्या या 'मूकनायकाला' स्वत:ची भाषा दलित कवितेने दिली. सामाजिक, सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक,धार्मिक क्षेत्रात समानतेचे तत्त्व या कवितेने उचलून धरले. समताधिष्ठित समाजाच्या निर्मितीसाठी वेदना, विद्रोह, नकार आदी विशेषांचे नवे भान घेऊन दुसऱ्या पिढीची कविता अवतरली. दुसऱ्या पिढीतील कवितेचे विशेष लक्षात घेत असताना या कालखंडातील काही महत्त्वाच्या कवींचा आढावा घेणे गरजेचे आहे.

### १) नारायण सुर्वे :

दुसऱ्या टप्प्यावरील नवकाव्याचे प्रवर्तक मर्ढेकरांच्या नंतर १९६० नंतरच्या मराठी कवितेने दलित काव्याच्या रूपाने तिसरे आणि नवे वळण घेतले ते कवी नारायण सुर्वे यांच्या काव्याने. 'ऐसा गा मी ब्रम्ह ।' (१९६२), 'माझे विद्यापीठ' (१९६६), 'जाहीरनामा'(१९७५), 'नव्या माणसाचे आगमन' (१९९५) या चारही काव्य संग्रहातून श्री. सुर्वे यांनी कामगार जीवनातील उघडी-नाघडी उद्ध्वस्तता प्रभाविपणे घडविली. दु:ख, व्यथेच्या शब्दांत अंगार ओतणारा हा कवी 'अमुची दुनियाच निराळी असल्याची

जाणीव सतत जागी ठेवतो. म्हणूनच इथल्या शोषित पिढीतांना अन्यायाच्या टाचेखाली तुडविले जाताना त्यांचा होणारा आक्रोश हा सुर्वेंच्या कवितेचा मध्य बिंदू आहे. कवी लिहितो,

> ''एकटाच आलो नाही युगाची ही साथ आहे.
> सावध असा तुफानाची हीच सुरुवात आहे''[१२]

आजपर्यंत जी वेदना उरात जपून ठेवली ती या आशेवर की, कधीतरी त्याला दवा मिळेल. पण ही वेदना अधिक असह्य करण्याचेच काम या परंपरेने केले. आम्ही आजपर्यंत काळोखात जगलो मात्र आता तसे होणार नाही.

> ''इथल्या वस्त्यांना हुंगणारा केवळ कातळाचा काळोख
> कंदील खोपटास खोवून वावरू नये, तर काय करावे ?
> ज्यांना जन्मभर दु:ख, दैन्य, दारिद्रयच मिळाले असेल
> त्यांनी तपशीलासह सर्वच नाकारू नये तर काय करावे ?''[१३]

या परंपरागत धार्मिक, दैविक, पुरातन संस्कृतीत भयावह व मूल्यहीन आयुष्य जगणाऱ्या माणसांचा विचार कवीला अस्वस्थ करतो. म्हणूनच ही धार्मिक, दैवी, पुरातन संस्कृती आणि तिचे सर्वच तपशील नाकारून कवी संघर्षाच्या नव्या धुमाळीत सामील होतो आहे.

सुर्व्यांच्या काव्यनिष्ठा सामाजिक संदर्भात 'दलित जाणिवा' च्या अपेक्षेत काहीशा वेगळ्या मानल्या जातात. पण त्यांच्या कवितेचे केंद्र 'माणूस' हेच आहे.

## २) नामदेव ढसाळ :

एकूण मराठी काव्य जगतातच खळबळ माजवून देणारा अत्यंत सामर्थ्यवान विद्रोही व बंडखोर कवी म्हणून नामदेव ढसाळांकडे पाहिले जाते. आंबेडकरी चळवळीची जाण असल्याने ढसाळांची कविता क्रांतीप्रवन परिवर्तनाशी नाते सांगत अवतरली. 'गोलपीठा' (१९७२), 'मुर्ख म्हाताऱ्याने डोंगर हलविला'(१९७५), 'आमच्या इतिहासातील एक अपरिहार्य पात्र : प्रियदर्शनी' (१९७६), 'तु ही इयत्ता कंची ? तुही यत्ता' (१९८१), 'खेळ' (१९८३), 'गांडूबगीचा' (१९८६), 'या सत्तेत जीव रमत नाही' (१९९५), 'मी मारले सूर्याच्या रथाचे सात घोडे' (२००५), 'तुझे हात धरून चालतो आहे' (२००६) इ. काव्य संग्रहातून नामदेव ढसाळ यांनी आपले वेगळेपण सिद्ध केलेले आहे.

डॉ. बाबासाहेबाच्या विचारावर पोसलेली नामदेव ढसाळ यांची कविता ही विद्रोहाचे धगधगते रूप घेऊन अवतरते. या कवितेसंबंधी भालचंद्र फडके म्हणतात, ''आजवर जे भोगले ते सांगता सांगता प्रस्थापित उलथून टाकण्याच्या पावित्र्यात ती उभी आहे.''[१४] ढसाळाची कविता हीच मुळात पांढरपेशा जगाच्या सीमा जेथे संपतात व जिथे निर्मनुष्य प्रदेश (नो मॅन्स लॅन्ड) सुरु होतो. तिथून चालू होते. त्यांच्या 'गोपपीठा'च्या प्रस्तावनेत विजय तेंडूलकर म्हणतात, ''गोलपीठा नावाने ओळखले जाणारे हे जग रात्रीच्या दिवसाचे, रिकाम्या किंवा अर्धभरल्या पोटांचे, मरणाच्या खस्ताचे, उद्याच्या चिंतांचे शरम आणि संवेदना जळून उरणाऱ्या मनुष्य देहाचे, असोशी वाहणाऱ्या गटारांचे, गटाराशेजारी मरणाची थंडी निवारीत पोटाशी पाय मुडपून झोपणाऱ्या तरुण रोगी देहांचे, बेकारांचे, भिकाऱ्यांचे, खिसेकापूंचे, बैराग्यांचे, दादांचे आणि भडव्यांचे.''[१५]

विजय तेंडूलकरांच्या वरील अभिप्रायावरून नामदेव ढसाळाच्या कवितेची जातकुळी लक्षात येते. आशय अभिव्यक्तीबरोबरच या कवितेने प्रस्थापित कवितेच्या रूपबंधाला हादरा दिला. आपले असे अभिव्यक्तीचे एक नवे तंत्र निर्माण केले. भाषा, घाट यांची मोडतोड झाली. या मोडतोडीबरोबरच विद्रोहाचे प्रखर रूप या कवितेला आले. म्हणूनच कवी त्वेषाने म्हणतो,

''हे महाग्यानी लोक हिंडताहेत..... मशाली पेटवून
गल्लीबोळातून चाळीचाळीतून – जेथे उंदीर उपाशी मरतात
त्या आमच्या खोपटातील काळोख म्हणे यांना कळतो.
पाणचट गवशी सारखे हे ही एक थोर !!
ज्यांना गांडीखालचा अंधार कळत नाही ! त्यांनी पेटलेल्या
माणसांना छप्पनटिकली बहुचकपणा अजूनही दाखवावा !''[१६]

ही कविताच मुळात माणूस म्हणून जगणे नाकारणाऱ्या विद्रोहातून जन्म घेते. म्हणून कवी इथल्या महाग्यानी धर्ममार्तंडांचा उपहास करतो. विद्रोहाने पेटलेल्या या कवीची झेप झंजावातासारखी झपाटणारी आहे. मनातली सगळी रग–धग–जळजळ, दु:ख, द्वेष, क्रोध, चीड सारी सारी कवीने बेमुर्वतपणे अंगावर निखारे फेकावेत तशी फेकली आहे. या विद्रोहाच्याच पोटात नव मानव्याची संकल्पना 'बाळसे' धरू लागली आहे. कवी म्हणतो –

"माण्साने पहिल्या प्रथम स्वत:ला
पूर्ण अंशाने उध्वस्त करून घ्यावे....
नंतर उरल्या सुरल्यांनी कुणालाही गुलाम करू नये. लुटू नये
आभाळाला आजोबा आणि जमीनीला आजी मानून
त्यांच्या कुशीत गुण्यागोविंदाने आनंदाने राहावे....
एक तीळ सर्वांनी करंडून खावा....
माणसावरच सुक्त रचावे
माणसाचेच गाणे गावे माणसाने."[१७]

विद्रोहाबरोबरच विश्वमानव्याची संकल्पना नामदेव ढसाळ यांची कविता व्यक्त करते. म्हणूनच योगेंद्र मेश्रामांनी त्यांना 'वर्तमान प्रवाहातील बंडखोर कवी' असे म्हटलेले आहे.

**३) केशव मेश्राम :**

केशव मेश्राम यांचे 'उत्खनन', 'जुगलबंदी', 'अकस्मात' असे तीन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. दलित काव्याला एक संवेदनशील कवितेची बैठक व मूलगामी परिणाम मेश्राम यांच्या कवितेने प्राप्त करून दिले. दलित समाजातील माणसाला जगण्यासाठी ज्याप्रकारे धडपडावे लागते, तो पिडनाचा प्रकार पाहून कवी चिडतो,

"साल्या तुकडाभर भाकरीसाठी
गाडीभर लाकडे फोडशील काय ?
चिंचुक नेसल्या आईच्या पटकुराने
घामेजले हाडके शरीर पुसशील काय ?
..... एक दिवस मी परमेश्वराला आईवरून शिवी दिली."[१८]

मेश्राम यांच्या कवितेतून विद्रोहाबरोबरच, मानसिक प्रक्षोभ, कारुण्य, उपरोध व वस्तुस्थितीभाव अशा संमिश्र विचारभावनांचा समुचित आविष्कार होतो. कवीची संवेदनशीलता व्यक्तित्वाकडून सामाजिकतेकडे झेपावताना दिसते.

### ४) दया पवार :

दलित कवितेला एक नवे परिमाण, सामर्थ्य प्राप्त करून देण्याचे कार्य दया पवार यांच्या कवितेने केलेले आहे. त्यांचा 'कोंडवाडा' हा संग्रह १९७४ साली प्रसिद्ध झाला. दया पवार यांची कविता ही त्यांनी प्रत्यक्ष भोगलेल्या जीवनानुभूतीचे दर्शन आहे. चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातिभेद, शोषण, छळणूक, आर्थिक, सामाजिक विषमता, दारिद्रय व अस्पृश्यता यांनी कोंडी केलेल्या दलित माणसांच्या दु:खाचे वंचनेचे, उपेक्षा, मानहानीचे प्रत्ययी दर्शन पवारांच्या कवितेत येते.

> ''देव धर्म आणि देश फडफडणारी ही तुमची बुजगावणी
> अक्कल हुशारीने रचलेत सापळे
> बोला माणूस चिरडला की नाही ?''[१९]

अस्पृश्यता व जातिभेदाने पोखरलेल्या आपल्या या भारत देशाच्या महान संस्कृतीवर, समाजव्यवस्थेवर कवी उपरोधिक प्रहार करतो. एकूण आयुष्यात भोगलेल्या दु:खातून आलेला निराशेचा, विषादाचा स्वर त्यांच्या कवितेत येतो.

### ५) वामन निंबाळकर :

वामन निंबाळकरांचा 'गावकुसाबाहेरील कविता' (१९७३) हा संग्रह प्रसिद्ध आहे. त्यांच्या कवितेतून दलितांच्या दारुण जीवनावस्थेबद्दल चीड व्यक्त होते. बुद्धाचे विचार हे खऱ्या अर्थाने समतेचा महान संदेश आहेत. समता, स्वातंत्र्य, बंधुता हा लोकशाही समाजवादाचा अर्थ निंबाळकरांची कविता सांगते. त्यांनी दलित जीवनालाच आपल्या कवितेचा विषय बनवलेले आहे. शब्दशक्ती असणाऱ्यांनी रचलीत महाकाव्ये सोन्याचा घास खाणारांची, भरजरी वस्त्र नेसणाऱ्यांची, आकाशात राहाणाऱ्यांची, पण मातृभूमीवरील दलितांच्या व्यथांची आसवांची गाणी त्यांनी कधीच गायिली नाहीत. म्हणूनच आता आम्हालाही शब्द सापडलेले आहेत. आता आम्हीही पेटवत जाऊ शब्दानेच देश आणि माणसे असा आत्मविश्वास निंबाळकरांच्या कवितेत येतो.

> ''शब्दांनीच पेटतात घरे, दारे देश
> आणि माणसे सुद्धा
> आणि विझवतात आग ही
> शब्दांनी पेटलेल्या माणसांची''[२०]

उगवत्या सूर्याची स्वप्ने घेऊन येणारा क्रांतीचा आवाज आजच्या सर्वच विद्रोही कवींचा आवाज आहे. निंबाळकरांच्याही कवितेत तो विद्रोही आवाज पेलण्याचे सामर्थ्य आहे.

**६) त्र्यंबक सपकाळे :**

ज्यांनी आपल्या विद्रोही सुराला दलित अभिव्यक्तिचे प्रमुख लक्षण मानले. त्या कवींमध्ये सपकाळे यांचे नाव येते. त्यांचा 'सुरुंग' (१९७६) हा कविता संग्रह दलित दु:खाच्या आविष्काराबरोबरच चीड, त्वेष, खेद, क्रोध यांचा आंतरिक उरस्फोट करतो.

''नागडा आलो
पण इथे ही नागवला गेलो
समाज पुरुषाच्या अहंकाराने
हे संस्कृतीप्रिय देशा !
माझा नागडेपणा तुला ! कधी झाकताच आला नाही.''[२१]

या देशात इथल्या संस्कृतीने स्वातंत्र्य प्राप्तीनंतर एवढा काळ लोटूनही उपेक्षितांना स्वातंत्र्य व समानसंधीपासून वंचितच ठेवले. याची कवीला भयंकर चीड आहे. म्हणूनच उपरोधात्मक पण सत्यस्थितीचा वेध घेऊन कवी विद्रोहाकडे वळतो. माणसाने माणसांची छळ-विटंबना करण्यास, पिळवणूक करण्यास सांगणाऱ्या या संस्कृतीला, समाज प्रवृत्तीलाच ह्या कवी मनाने आपल्या कवितेतून सुरुंग लावला आहे.

**७) प्रल्हाद चेंदवणकर :**

भोगलेल्या जीवनवास्तवाचा जाळ संवेदनशील भावानुभूतीसह कविताबद्ध करणारे चेंदवणकर हे विद्रोही कवी असल्याची प्रचिती 'ऑडिट' वरून येते. त्यांचे 'ऑडिट' (१९७६) आणि 'ऑर्डर ऑर्डर' हे दोन कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. डॉ. बाबासाहेबानी सामाजिक विषमता, जातियवाद, बौद्धिक मानसिकता, दास्य या विरोधी लढा देऊन हिंदू समाज संस्कृतीला आव्हान दिले. त्याच आव्हानाच्या भाषेत चेंदवणकरांची कविता बोलते.

''मग, चल उठ तर......
तुझा खांदा, माझा खांदा ! नटबोल्टने टाईट सांधू या
तुझे रक्त, माझे रक्त ! एका बॉयलरमध्ये ओतू या

अणु-स्फोटाचाही झाला नसेल ! असा प्रचंड स्फोट करूया''[२२]

सात्विकता व पुरोगामीवृत्ती घेऊन आतून जातीद्वेष जळत ठेऊन अन्यायाला हाती घेणाऱ्या दुटप्पी, ढोंगी वृत्तीवर ही कविता प्रहार करते. ही कविता अनुभव, अवलोकन व चिंतन यातून आलेली असल्याने अन्यायाचा मुकाबला करण्यास ती तयार झालेली आहे. चेंदवणकरांची कविता सामाजिक संवेदनांचा आवाज घेऊन हुंकारते.

## ८) ज.वि. पवार :

ज.वि. पवार यांचे 'नाकेबंदी' (१९७६) व 'उच्छवास युगंधराचे' हे दोन कविता संग्रह आहेत. हाके-हाकेवर नाकेबंदी करणाऱ्या दलितांच्या अस्तित्वालाच नख लावणाऱ्या संस्कृती विरोधीचे कढ नाकेबंदीतून बाहेर पडलेले आहेत. पवारांची कविता ही बाबासाहेबाच्या विचारक्रांतीची प्रेरणा घेऊन बोलते. ती चळवळीची भाषा बोलते. त्यामुळे ती वैयक्तिक न राहता सामाजिकता धारण करते. पिढ्या-न्-पिढ्या ज्या संस्कृतीने दलितांची जी नाकेबंदी केली त्याच्या विरोधात हे शब्द शस्त्र होऊन येतात.

''हे ही मीच सांगावे का, की उभारलेले हात
माझे आकाश छेदून जात आहेत
ग्रंथाग्रंथातील रक्त उतरत चाललय माझ्या डोळ्यात
पेटलाय वणवा झालाय भडका''[२३]

पवारांची निष्ठा वर्गीय असण्यापेक्षा सामाजिक आहे. ती शुद्ध आंबेडकरी आहे. म्हणूनच सामुहिक वेदनेचा आवाज देणाऱ्या समाज-संस्कृतीला जशी नाकारते तशी ती साहित्य संचितालाही नाकारते.

## ९) अर्जुन डांगळे :

'छावणी हालते आहे'(१९७७) हा डांगळे यांचा कवितासंग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितेत समाज जीवनाच्या कुरूपतेचे चित्र जेवढ्या प्रभावीपणे येते तेवढ्याच प्रभाविपणे मानवी मनाच्या शोषिकतेचा व समंजसपणाचा उद्गारही सापडतो. डांगळे यांची कविता नेहमी आव्हानाच्या भाषेत बोलते. प्रकाशमान भविष्यावर डोळे लागलेल्या या कवीची समाजाशी बांधलेली नाळ कायम ठेवण्याची अनन्य निष्ठा आहे. समाजाच्या वेदनेशी अनुकंप आहे. म्हणूनच भुके कंगालांचा जुलूम होऊन कवी म्हणतो,

"तू गात रहा – भुके कंगालांचा जुलूस होऊन
तू गात रहा – मुक्तवाहिनी किंवा व्हिएतनामी होऊन
तू गात रहा – चवदार तळ्याचा सत्याग्रह होऊन"[२४]

मुक्तवाहिनी, व्हिएतनामी किंवा चवदार तळ्याचा सत्याग्रह या ऐतिहासिक घटितांची लढाऊ स्मृती घेऊन येणारी ही कविता परिकथेप्रमाणे केवळ काल्पनिक नसून इथल्या मातीच्या गंधाने माखलेली वास्तवाशी झुंजणारी आणि चळवळीच्या छावणीची अस्मिता जागी करणारी आहे.

**१०) यशवंत मनोहर :**

यशवंत मनोहर यांनी 'उत्थान गुंफा' (१९७७), 'डॉ. आंबेडकर एक चिंतन काव्य' (१९८२) आणि 'मूर्तीभंजन' (१९९५) हे तीन संग्रह प्रसिद्ध केलेले आहेत. मनोहरांच्या कवितेने विद्रोहाची परिसीमा गाठलेली आहे. प्रस्थापित कवितेला नवे विद्रोहाचे हादरे देण्याचे काम या कवितेने केलेले आहे. मनोहरांची कविताही मनात उकळणाऱ्या विद्रोहाचे रसायन आहे. इथल्या पक्षपाती संस्कृतीवर तीने जोराचे प्रहार केलेले आहेत. दलित जाणीव व अभिव्यक्तीचे अपूर्वरूप मनोहरांच्या कवितेने साकारले आहे.

"पाखंड्यानो आता । नका मारू थापा
आम्ही झालो गुंफा । उत्थानाच्या ।।"[२५]

मनोहरांची कविता व्यवस्थेविरोधी विद्रोह प्रकट करत समर्थपणे पुढे जाणारी आहे. त्यांच्या कवितेसंबंधी प्रा. रा.ग. जाधव म्हणतात, "ही कविता सर्वकष विद्रोहाची कविता आहे. इतका समग्र विद्रोह मराठी साहित्यातच नव्हे, तर भारतीय साहित्यातही अशा स्वरूपात प्रकट झालेला आहे काय ?"[२६]

याच बरोबर बाबुराव बागूल (नियतकालिकातील फक्त १५ कविता १९६८), शरणकुमार लिंबाळे, (उत्पात), बी. रंगराव (इडिपस), बळवंत कांबळे (निषेध) अशोक पाटील (बस्तान), भीमसेन देठे (होरपळ, कृष्णमेघ), हरीश बनसोडे (हू वील डायग्नोस इट), दामोदर मोरे (विमुक्त), फ.मु. शिंदे (जुलूस, वृंदगान), बाबुराव जगताप (निळ्या पहाटेच्या कविता) इ. कवींनी ही पिढी समृद्ध केलेली आहे.

दुसऱ्या पिढीच्या कवितेचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे दुसरी पिढीही प्रामुख्याने विद्रोहावर भर देणारी आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कृती आणि कार्यामुळे

दुसरी पिढी भारावून गेली होती. व्यवस्थेतील हिन परंपरांच्या विरोधात आवाज उठविण्याची एक उर्मी या पिढीच्या कवितेत दिसून येते. याशिवाय दलित समाजाच्या दु:ख, वेदना या पिढीच्या कवितेने अतिशय दाहक शब्दांत मांडलेल्या आहेत.

## ३.२ तिसऱ्या पिढीतील दलित कविता:

दलित कवितेच्या पहिल्या जोमदार लाटेनंतर दलित कवितेत काहीसा एकसुरीपणा, साचेबंदपणा येऊ लागला. अनुकरणही बऱ्याच प्रमाणात होऊ लागले. त्यामुळेच दलित कवितेत साचलेपणा आला आहे असे आरोप टीककारांनी केले. त्यात तथ्यांश नाही असे मुळीच नाही. परंतु या साचलेपणाला छेद देणारी कविता याच काळात लिहिली जात होती व स्वत:चा असा वेगळा ठसा उमटवत होती.

या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात उदयाला आलेल्या दलित कवींच्या या पिढीने कवितेला नवे वळण, नवे आयाम देण्याचा प्रयत्न केला. पूर्वसुरींच्या कवितेपेक्षा या कवितेने अभिव्यक्तिच्या नव्या वाटा चोखाळल्या. त्यामुळे मराठी कवितेच्या मध्यवर्ती मुख्य धारेत स्थान मिळविण्याचे सामर्थ्य तिच्यात आलेले आहे. कायद्याने अस्पृश्यता नष्ट झाली. असली तरी, आजही सामाजिक वास्तवामध्ये बदल झालेला नाही. ही स्वत्वाची जाणीव या पिढीतील कवींना झालेली आहे. या पिढीचे मन संवेदनशील आणि आंबेडकरी विचाराने प्रगत आणि प्रगल्भ झालेले असल्याने ही कविता मराठी कवितेत फार मोठी क्रांती घडविताना दिसते आहे.

या प्रवाहात प्रामुख्याने भुजंग मेश्राम, वाहरू सोनवणे, विनायक तुमराम, माधव सरकुंडे, राम दोतोंडे, अरुण काळे, लहु कानडे, महेंद्र भवरे, मधु गवई, शिवाजी सोनवणे, लोकनाथ यशवंत, बबन लोंढे, भाऊ पंचभाई, केतन पिंपळापूरे, जावेद कुरेशी, इत्यादी कवींचा प्रामुख्याने विचार करावा लागेल. या काळात कविता लिहिणाऱ्या स्त्री कवयित्रीचाही आढावा घ्यावा लागेल.

### १) लोकनाथ यशवंत :

लोकनाथ यशवंत यांचे 'आता होऊन जाऊ दया', 'आणि शेवटी काय झाले.' हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. लोकनाथ यशवंताची कविता शीर्षकापासून रचनेपर्यंत वेगळेपण सिद्ध करणारी आहे. यशवंतांची कविता सामाजिक बांधिलकीच्या झालेल्या सर्व शोकांतिका डोळयात साठवून वाटचाल करीत आहे. या शोकात्म कथांकडे तटस्थपणे पाहत अनुत्तरीत प्रश्नांचा शोध ही कविता घेते.

'अनादी काळापासून एक प्रस्थापित काठी
सतत आपल्या पाठीवर उगारून आहे.'[२७]

**शोषणाचा इतिहास, वर्णव्यवस्था समाजाचे बंदिस्त स्वरूप माणासाला पशू** पातळीवर जगायला लावणारी तत्वज्ञाने, रूढी परंपरा या सर्व अमानुष गोष्टींवर ही कविता आक्रमण करते. मुळात मूक समाजाला वाचा देणाऱ्या क्रांतीकारी विचार कृतीचे सामर्थ्य इथे सूचित होते. दलितांच्या अस्तित्वात बंधमुक्तीची स्फुर्लिंगे पेरणारे डॉ. बाबासाहेब त्यांचा आक्रमकपणा, क्रांतीप्रवणता याच्या पायावर उभी असलेली यशवंतांची कविता ही तितकीच आक्रमक आणि क्रांतीसन्मुख होऊन येते.

''माणसांनी असे ऐनवेळी पलायन करू नये
वस्ती जळायला लागली की पळून जाऊ नये'' [२८]

यशवंताची कविता माणासाला विधायकतेसाठी लढायला प्रवृत्त करते म्हणून ती बुद्धत्वाकडे जाणारी आहे.

**२) भुजंग मेश्राम :**

भुजंग मेश्राम यांचा 'उलगुलान' हा १९९० साली प्रकाशित झालेला कवितासंग्रह आहे. यातील कवितेने आदिवासी दु:ख, दारिद्र्य समोर मांडले. आदिवासींच्या क्रांतीकारी लढ्यातून, संघर्षातून ही कविता आकाराला आलेली आहे. या क्रांतीकारी विचारांचा प्रणेता हा महान क्रांतीकारक बिरसामुंडा आहे. त्यांनी या व्यवस्थेविरोधी जो लढा दिला. याच भूमिकेतून इतिहासाचे विश्लेषण ही कविता करते. मेश्रामांची कविता अन्यायी व्यवस्था, रूढी परंपरा याना ठाम नकार देते. त्याच्या विरोधात विद्रोह पुकारते. हा विद्रोह प्रकट करण्याची पद्धत ही आक्रस्ताळी नाही. ती आत्मशोधाची जाणीव झालेली आहे.

मराठी कवितेत आजपर्यंत न आलेले रानवस्ती डोंगरदऱ्यात खितपत पडलेले समाजजीवन 'उलगुलान' मध्ये मेश्राम यांनी चित्रित केलेले आहे. या कवितासंग्रहाबद्दल महेंद्र भवरे लिहितात, ''आदिवासी समूहमनाचा आविष्कार म्हणजे उलगुलान आणि आदिवासी भारताची शोधयात्रा म्हणजे उलगुलान.''[२९] हा इतिहास आमचा आहे. तो आम्ही घडविला मात्र त्याचे हक्कदार दुसरेच झाले. याविषयी ही कविता चीड व्यक्त करते.

'ते आले तेव्हा, त्यांचेकडे भटकंती होती आणि
आमच्याकडे इतिहास : ते म्हणाले, 'आपण सर्वच करू अदलाबदल
अन् बदलू जग' केला विश्वास, आता त्याचेकडे आहे इतिहास
अन् आमचेकडे विमुक्ती.''[३०]

एकूणच आदिमतेचा आदिवासींच्या दुःख यातनांचा पट ही कविता उलगडते. मेश्राम यांची कविता भूतकाळ आणि वर्तनकाळ अशा अवकाशात लंबकासारखी फिरत राहते. इतिहासाच्या आकलनातून प्राप्त झालेल्या आत्मभावनातून आपल्या समुहाला कराव्या लागणाऱ्या संघर्षाच्या वाटा ही कविता दाखविते. संघर्ष मूल्यांची प्रचिती या कवितेत प्रकर्षाने जाणवते.

**३) वाहरू सोनावणे :**

''गोधड'' हा सोनावणे यांचा संग्रह १९८७ मध्ये प्रसिध्द झाला. आंबटवास सोसता सोसता पूर्वज विझून गेले, आणि अश्रुंनी गोधड भिजविणे तेवढे वर्तमानकालातील वारसदारांच्या वाट्याला आहे. अशी दुःख दैन्याची, वाताहातीच्या आयुष्याची कहाणी गोधडमध्ये वाहरू सोनवणे यांनी खोलली आहे. आदिवासींच्या इतिहासाच्या प्रत्येक टप्प्यावरील तणावग्रस्तीचा इतिहास ही कविता स्पष्ट करते.

''आमचे दुःख आमचेच राहिले, कधी त्यांचे झाले नाही
आमची शंका आम्ही कुजबुजलो, ते कानटवकारून ऐकत राहिले
नि सुस्कारा सोडला, आमचे कान धरून आम्हालाच
दम भरला, माफी मागा नाहीतर ...''[३१]

'गोधड' मधील कविता जशी आदिवासींच्या दुःखमय गुलामगिरीचा इतिहास सांगते, तशी ती आपल्या माणसांना मानवी मूल्य प्रस्थापनेसाठी युद्धमय होण्याचा आदेश ही देते. क्रांतीला अलिंगन दयायला ही कविता सज्ज आहे. तसेच अन्यायी व्यवस्थेला शेवटच्या क्षणापर्यंत विरोध करण्याचे ही ती आवाहन करते. आणि म्हणून 'रक्ताचा झेंडा फडकावत जावा' असे ती सांगते. इथल्या माणसाला न्याय देण्यासाठी स्वातंत्र्य किती कुचकामी ठरले यावर ही कविता जहाल भाष्य करते.

'गोधड' मधील कविता ही दलित कवितेपेक्षा वेगळ्या अशा समूह जीवनाचे दर्शन घडविते. फाटक्या जगाच्या वाताहतीची कहाणी अधोरेखित करते. दुःखाच्या

वस्त्राचे उसवलेले जिर्णपदर उकलत जाते आणि वास्तवाला सामोरे जाण्याचे आवाहन करीतच युद्धाचा पवित्रा घेते.

**४) अरूण काळे :**

अरूण काळे यांचे 'रॉक गार्डन'(१९९३) व 'सायरनचे शहर'(१९९७) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. काळे यांची कविता दंगल-दशहत-दडपशाही आणि दांभिकता या वास्तव गोष्टींचे भयानक स्वरूप उघडे करते. त्यातून धर्म, समाज, राजकारण, सांस्कृतिक क्षेत्र, वस्त्या, माणसे, टोळ्या, मेंढरे, बुळगे, गिधाडे, घुबडे या सर्व घटकांच्या अनुशंगाने येणारे सामर्थ्य आणि दुबळेपण , दशहत, भित्रेपणा, क्रुरता आणि कारूण्य, हिंसाचार आणि शांतता, कलह आणि तह, धुरकटपणा आणि काळवंडलेपणा ही सर्व विरोधके आत्मशोधाच्या जाणिवेतून स्पष्ट होत जातात. काळे यांची कविता बदलत जाणाऱ्या माणसाचे चित्रण करते. त्याचबरोबर हिनप्रवृत्तीवर हल्ला ही करते.

'बलात्कार केलेस गाभाऱ्यात
इश्वराला स्मरून
अनौरसाचा बाप झालास
देहजीव जाळून.' [३२]

प्रेम, नितिमत्ता आता कालबाह्य ठरली आहे. मूल्यहीन वातावरणाने सांस्कृतिकक्षेत्र डागाळले आहे. जगाच्या कल्यानासाठी शांततेचा संदेश देणारी तत्त्वज्ञानेच माणसाने बाद ठरविली आहेत. या आलम दुनियेला निर्मनुष्य करण्यासाठी माणसाचा मेंदू सज्ज झाला आहे. या मानवतेला उध्वस्त करणाऱ्या कृत्यांचा ही कविता निषेध नोंदवते. दलित कवी म्हणून अरूण काळे यांची कविता जशी श्रेष्ठ आहे. तसेच तिला चिंतनाचे तेजही अधिक आहे.

**५) दीपक त्रिभुवन :**

दीपक त्रिभुवन यांचा 'खोल खदानी'(१९९२) आणि 'माणसाचा जनक आणि इतर कविता'(१९९६) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. त्रिभुवन यांची कविता आत्मशोधातून चिंतनगर्भतेकडे प्रवास करते. त्रिभुवन यांच्या कवितेतील प्रत्येक सकाळ आणि संध्याकाळ भुकेलेली आहे. मरणाच्या महाअस्तराची मूळे तिच्या खोल

आतड्यात खोलवर रूजलेली आहेत. ही कविता म्हणजे रौद्र उफाळलेले भूकेचे विराट संगीत आहे. श्रमसंस्कृतीचे भीषण वास्तव हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

समकालीन दलित कवितेच्या प्रवाहात दीपक त्रिभुवन यांच्या कवितेने दलित कवितेला नवे वळण देण्याचा प्रयत्न केलेला आहे. या कवितेने उपेक्षित जग प्रामुख्याने साकारले आहे.

''कुठला ही धर्म भंग्याला भंगी
वेश्येला वेश्याच ठेवतो
कुठलेही साम्राज्य भंगी आणि वेश्यांना तळाशी गाडतं ''[३३]

इथल्या धर्माच्या आणि शोषणाच्या विरोधात त्यांची कविता आक्रमक होते. एकूणच त्रिभुवन यांची कविता आत्मशोधातून आत्मभान याचे निरिक्षणही करते.

**६) केतन पिंपळापूरे :**

केतन पिंपळापूरे यांचा 'सूर्यकंकण'(१९९५) ला प्रकाशित झाला. त्यांच्या कवितेविषयी त्यांच्या भूमिका पाहिल्यास त्यांच्या कवितेचे सामर्थ्य लक्षात येते. ते म्हणतात,''चारदोन पुस्तके वाचतानाच काहीतरी केले पाहिजे, अशी जाणीव मनात रूजली आणि माणसाच्या श्रमाच्या, रक्ताच्या घामाच्या, अश्रुंच्या आणि प्रेमाच्या कविता लिहू लागलो. ज्या आंबेडकरी समाज समूहातून आलो, त्यांच्या व्यथा, वेदना जवळून पाहिल्या, स्वत: भोगल्या जे भोगलो जे जगलो ते शब्दात मांडले.''[३४] पिंपळपूरेंची कविता ही आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्याची कविता आहे.

''ज्यांच्या शब्दांना कधी फुटलीच नाही
माणसांसाठी मायेची पालवी
ते शब्दांचे जादूगार आमचे आदर्श नाहीत ...
व त्यांचे कॉस्मेटिक शब्द ही ...''[३५]

दलितांतर्गत दलित जीवनाचा शोध घेण्याचा प्रयत्न या कवितेने केलेला आहे. एकंदरीत अलिकडच्या दलित कवितेत पिंपळपूरे यांची कविता ही परिवर्तनाकडे वाटचाल करणारी आहे.

७) **लहू कानडे :**

लहू कानडे यांचे 'टाचाटिभा'(१९९६) 'क्रांतीपर्व'(१९९२) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. कवी ज्या समाजजीवनातून आला ते समाजजीवन त्याच्या कवितेतून अधोरेखित होते. अस्पृश्यतेचा दाहक अनुभव हा या कवितेच्या केंद्रस्थानी आहे. जातीव्यवस्थेच्या आवर्तात सापडलेल्या समुहजीवनाची, जातीव्यस्थेने दिलेल्या अटळ दु:खाची कहाणी या कवितेने मांडलेली आहे.

'आठवून हाल
रडायचा बाप
चावायचे साप
जातीचेच.' [३६]

कानडे यांची कविता मानवाच्या जीवनाच्या अदिम इतिहासाचा शोध घेते. नव्या शतकाची चाहूल आणि हाताशी लागणाऱ्या काही शक्यता यातून अस्वस्थ मनाची स्पंदने कानडेंच्या कवितेतून अविष्कृत होतात. थोडक्यात या कवितेत दलित कवितेचे विकसित रूप दिसून येते.

८) **जावेद कुरेशी :**

'बएत' हा जावेद कुरेशी यांचा संग्रह १९९७ साली प्रकाशित झाला. दलित कवितेशी नाते सांगणारा हा पहिलाच कवितासंग्रह आहे. 'बएत' मधील कविता मुस्लिम दलित समाजाची व्यथा, वेदना, संघर्ष साकार करते. फुले-आंबेडकरी तत्त्वज्ञानाने संवेदनशीलतेपासून संघर्षशीलतेपर्यंत मजल मारण्याचे बळ या कवितेला मिळालेले आहे. आपला पूर्वेइतिहास काय आहे हे कवीला माहित असल्यानेच तो फुले-आंबेडकरांशी आपले नाते सांगतो.

मुसलमानी जातीव्यवस्थेवर या कवीने प्रकाश टाकला आहे. अश्रफी व्यवस्थेची दांभिकता ही कविता चव्हाट्यावर मांडते .

''ढोरांची कातडी सोलता सोलता केव्हा
इथंही जात ताठरली कळलेच नव्हते
पोरीच्या स्थळासाठी शब्द टाकल्यावर
क्या? तुम कस्साब .... क्या तुम पिंजारे

क्या ? तुम ढोमणे ..... हलालखोर .......अर्जल

हम इनकी लडकी नही मांगते.''[३७]

मुस्लिमांच्यात सुद्धा जातीव्यवस्था आहे. त्यांचे भीषणरूप या कवितेने उघडे केले आहे. जावेदकुरेशी यांची कविता मराठी आणि दलित कवितेला अपरिचित असलेल्या एका वेगळ्या जगाचे, संस्कृती संघर्षाचे चित्र रेखाटते. एका नव्या अस्मिता युद्धाची घोषणा करते. प्रस्थापित व्यवस्थेला नकार देऊन पैंगबर, फुले–आंबेडकरांच्या तत्त्वावर नवसमाज निर्मितीचे स्वप्न पाहणारी ही कविता आहे.

**९) माधव सरकुंडे :**

माधव सरकुंडे यांचा 'मनोगत' (१९९७) ला प्रकाशित झाला. कवी ज्या समूहातून आला आहे त्या जगाचे स्वरूप स्पष्ट करतानाच स्वत:ची ही ओळख करून देतो. आणि स्वत:बरोबर समाजाचे ही स्वरूप स्पष्ट करतो.

'एकाच हॉटेलमध्ये आठरापगड माणसं येतात
एकाच प्लेटमध्ये जेवून जातात –
म्हणून देशात समानता आली असे मानू नये–
जिथं जन्मताच होतात शिक्कामोर्तब घनघोर शाप
तिथं मिळतील उ:शाप असे मनातही आणू नये.'[३८]

सरकुंडे यांच्या कवितेत आत्मभान आहे. आत्मभानात आत्मशोध आहे. तसेच 'स्व'च्या अस्तित्वाबरोबर समूह जीवनाच्या रूपाचे आकलन आहे. सरकुंडे यांची कविता स्त्रीशोषणाचा पट मांडते. त्यांची कविता दलित कवितेतील एका दुर्लक्षित जगाची पार्श्वभूमी घेऊन आलेली आहे. आदिवासी जीवनाचा भेदक आविष्कार या कवितातून व्यक्त झाला आहे. या कवितेत उपेक्षित, शोषित आणि बहिष्कृत माणसांच्या दु:खाचेच मनोगत उमटलेले आहे.

**१०) कृष्णा निर्मळे :**

कृष्णा निर्मळे यांचे 'पाणुता' (२००३)व 'येस' (२००५) हे दोन कवितासंग्रह प्रकाशित आहेत. प्रस्थापित समाजव्यवस्थेने मूल्यहीन ठरवलेल्या आपल्या समाजाचे दु:ख या काव्यसंग्रहातून शब्दरूप झालेले आहे. जिथे परिवर्तन आहे तिथे बंडखोरी आहे. निर्मळेंची कविता हीच बंडखोरी घेऊन येते. माणसाला

महत्त्व देणारी ही कविता माणूस बनू पाहणाऱ्या पण व्यवस्थेने बाहेर टाकलेल्या माणसाला हाक देते, त्याला हात देते. इथली विटंबना गेली अनेक पिढ्या चालू आहे. कवी म्हणतो.

'पाणुत्यांची वेदना
पापण्यांच्या पाण्यानेही मिटेना
पाणउतारा मात्र थांबेना '[३९]

प्रखर सामाजिक दु:खाला निर्मळे यांची कविता जवळ करते. त्या दु:ख देणाऱ्या घटकांवर 'रापी' चालवताना दिसते.

''अंगठा लावता लावता
एक ऐकलं भाषण
ते म्हणाले चप्पल काढीन
मला वाटल लावायला
त्यांना वाटलं
घाबरावयाला'' [४०]

जगून झालेल्या आयुष्याचे वास्तव ही कविता घेऊन येते. आपल्या अस्मितेवर पाय ठेवणाऱ्याशी ही कविता मुकाबला करण्यास तयार आहे. निर्मळे यांच्या कवितेने दलित प्रवाहात आपले एक वेगळे स्थान निर्माण केलेले आहे.

### ११) विनोद कांबळे :

विनोद कांबळे यांचा 'चव' (२००२) संग्रह प्रकाशित झालेला आहे. शतकानुशतकांच्या अंधाराचा ठाव घेऊन प्रकाशाचा किरण शोधत 'चव' मधील कविता येते. भारतीय समाजाच्या वैचित्र्यपूर्ण जीवनशैलीतील कलंकित जातीय परंपरेत जन्म घेतलेल्या कवीच्या वेदना ह्या तीव्र आहेत. 'चव'मधील कविता माणसातली माणूसकी शोधते.

''व्यथा वेदनांची
मी मांडणार नाही
कैफ भंग झालेल्या स्वप्नांना

पुन्हा फुलविणार नाही......
मातीमोल इथल जीनं
स्वातंत्र्याचं नाव
मी ?
घेणार नाही.''[४१]

शतकानुशतके स्वातंत्र्याच्या शोधात असणाऱ्या माणसांना स्वतंत्रतेच्या उत्कर्षाच्या वाटेवर घेऊन जाण्याचा आशावाद ही कविता घेऊन आलेली आहे.

याशिवाय या पिढीतील अनेक कवींनी कविता लिहिली. सागर जाधव, (उजेड), बाळ हाटे, (रक्त खुणा), राम दोतोंडे, ('रापी जेव्हा लेखणी होते') आणि ('गल्ली बदललेला मोर्चा'), मधु गवई, अशोक चक्रवर्ती, बबन लोंढे, भास्कर खंदारे, प्रमोद लांडगे इत्यादी अनेकांनी या काळात कविता लिहिली आहे, लिहित आहेत.

या काळात स्त्रियांनीही काव्यलेखन मोठ्या प्रमाणावर केलेले आहे. दलित कवयित्रींची कविता ही भावनोत्कटतेपेक्षा चिंतनशीलतेशी जवळचे नाते सांगते. स्वत:बरोबर वाचकालाही अंतर्मुख करून नव्या विचारांकडे झेपवावयास लावणारी ही कविता आहे. पुरुषी अहंकाराने आजपर्यंत जे शोषण केले त्या शोषण व्यवस्थेविरूद्ध ही कविता बोलते, आक्रोशते मात्र हा आक्रोश उरबडवा नाही. पुरुषी पंखाखाली स्वत:ला जपणे हे ही तिला मान्य नाही. ती शोध घेत असते स्वत:च्या अस्तित्वाचा म्हणूनच प्रखर आत्मशोधन हे दलित कवयित्रींच्या काव्यलेखनाचे वैशिष्ट्य आहे. या अनुषंगाने काही स्त्री कवयित्रींचा आढावा घेता येईल.

### १) ज्योती लांजेवार :

ज्योती लांजेवार यांचा 'दिशा' (१९८२) हा काव्यसंग्रह प्रकाशित आहे. लांजेवार यांची कविता ही मानवतेच्या आणि समानतेच्या प्रतिष्ठापनेसाठी क्रांतीतकारक नवविचारांची पेरणी करणारी व परिस्थितीचा अन्वयार्थ लावणारी आहे. समाज सेवेच्या गप्पा मारताना परिवर्तनवादी मंडळी बेगडी वागतात. अशा बेगडी परिवर्तनवाद्यांचा बुरखा फाडण्याचे काम या कवितेने केलेले आहे. आपल्या स्वार्थासाठी ज्यांनी दुकाने थाटली या दुकानी व्यवस्थेविरूद्ध ही कविता आवाज उठवते. स्त्रियांच्या दु:खाच्या विविध पदरांनाही ही कविता सक्षमपणे मांडते.

"माझ्या डोळ्यापुढे सतत उभी असते
कौरवांच्या राज्यसभेत बेअब्रू होणारी पांचाली"[४२]

इतिहासाची वास्तवाशी सांगड घालून महाभारतकालीन स्त्रीची जशी अवस्था होती तशी ती आजही आहे. त्यात कोणताही बदल झालेला नाही. एकूणच नवक्रांतीसाठी प्रवृत्त करत असताना या कवितेने विवेक जपला आहे. विवेकातून पेटणे हे या कवितेचे लक्षण आहे. नव्या क्रांतीचा ध्यास घेऊन नवसंस्कृती निर्माण करण्याचे या कवितेचे प्रयोजन हे माणूसकीवर आधारलेले आहे.

## २) सुरेखा भगत :

सुरेखा भगत यांचा 'साक्ष' हा कवितासंग्रह प्रकाशित आहे. वास्तवता आणि जीवनातील भीषण नाट्य पकडण्याचा भगत यांच्या कवितेने प्रयत्न केला आहे. भगत यांची कविताही रुढी-परंपरेच्या विरोधी बोलते.

"दु:खितांचे आसू पुसण्याऐवजी
आसू येणेच थांबविले पाहिजे"[४३]

कवयित्रिच्या कवितेमधून अस्तित्ववाद डोकावतो. परंतु त्याला कार्यकारणभाव असल्याने तो संयमाने व्यक्त होतो. ही कविता आशावादाकडे झुकलेली आहे. स्वत:च्या आत्मपरीक्षणातून ती पुढे जाते. हे या कवितेचे वैशिष्ट्य आहे.

## ३) प्रज्ञा लोखंडे :

प्रज्ञा लोखंडे यांचा 'अंत:स्थ' हा दलित कवितेतील एक महत्त्वाचा काव्यसंग्रह आहे. 'अत:स्थ' मधील कविता परंपरेच्या चिरेबंदांना हादरे देतच आलेली आहे. डॉ. बाबासाहेबाच्या विचारांचे वादळ या कवितेतून घोंघावताना दिसते. लोखंडे यांच्या कवितेविषयी ज्योती लांजेवार म्हणतात, "शोषित स्त्री जेव्हा मनातला व डोक्यातला काळोख घेऊन उजेडाच्या मार्गावर चालू लागते आणि आत्मभान निर्माण करण्यासाठी शब्दांचे रान तुडवू लागते. तेव्हा तिला अनुभवांची आरास नको असते. वेदनेची सजावट नको असते"[४४] स्त्री मनाची घालमेल या कवितेतून व्यक्त झालेली आहे.

'स्त्रीत्वाचा मूक आक्रोश सजवण्यात
धन्य असलेली आपली महान संस्कृती
.... जोहारापासून सतीपर्यंतचा हा प्रवास

इक्कीसवी सदीत तसूभरही बदलला नाही
रूपकुंवर .... !'[४५]

बहुजनांची येथील अध्यात्मवादी अभिजन संस्कृतीने वाताहातच केली. बहुजनातील ही दु:खे एकत्र येऊन त्यांनी स्वंयप्रकाशी व्हावे असा आशावाद ही कविता जपताना दिसते. एकंदरीत प्रज्ञा लोखंडे यांची कविता अत्यंत प्रगल्भ, शांत एकसूरी न होता ती आत्मशोधाची जाणीव समर्थपणे प्रकट करते.

**४) प्रतिभा राजानंद :**

'मला हवी असणारी पहाट' हा प्रतिभा राजानंद यांचा दलित कवितेला स्त्रीवादाचा नवाआयम देणारा कवितासंग्रह आहे. स्त्री-पुरूष समानतेचा पुरस्कार ही कविता जोरदारपणे करते.

'संपू पाहतेय मी या चक्रव्यूहाला छेदण्या अन् भेदण्यातच
माझ्या 'स्त्रीत्वानं' ओढलेल्या अन् वेढलेल्या
कुणाकुणाला टाळण्या-फेटाळण्यात खर्च करावं
सामर्थ्य.'[४६]

प्रतिभा राजानंद यांची कविता स्त्रीवादाचा जोरदार पुरस्कार जशी करते तशी ती इथल्या सांस्कृतिक, धार्मिक परंपरेलाही विरोध करते.

**५) कुसुम अलाम :**

'रान आसवांचे तळे' (१९९८) हा कुसुम अलाम यांचा कविता संग्रह प्रकाशित आहे. त्यांच्या कवितेतून सामुहिक स्वरूपाचे दु:ख व्यक्त झालेले आहे. जोपर्यंत विषमता आहे तोपर्यंत विद्रोह आहे. अशी ठाम भूमिका या कवयित्रीची आहे. ही कविता कपटी मनुसंस्कृतीचे जोखड झुगारून देते.

''तू मला तुझा फक्त एक श्वास दे
मी माझ्या गर्भाला
अशा अहिंसेतून वचनमुक्त करीन''[४७]

दु:खाच्या आसवांचे तळे क्रांतीसाठी पेटून उठले आहे. ही आत्मशोधाची जाणीव या कवितेतून व्यक्त होते.

### ६) कुमुद पावडे :

'अंत:स्फोट' (१९८०) हा कवितासंग्रह युगानुयुगांपासून जिच्या अतित्वाची कोंडी करून माणूस म्हणून जगण्याचे हक्कच नाकारण्यात आले अशा भारतीय समाजजीवनातील स्त्रीदु:खाचे हुंदके घेऊन आला आहे. अठराविश्व दारिद्रयात खितपत पडलेल्या स्त्री दु:खाचा प्रत्यय ही कविता देते.

''एका अनैतिक डुक्कर मुसंडीने
कोवळ्या नववधूचं गुप्तांग चिरलं जाते
इज्जतीच्या भाजीपाल्याच्या धाकानं
तिला रॉकेल ओतून पेटवलं जातं.''[४८]

इथे जगण्यातील सुरक्षिततेची कोणतीही निश्चिती नसल्याचे कवयित्रीने स्पष्ट केलेले आहे. कुमुद पावडे यांची कविता ही स्त्री दु:खाचा एक महापट मांडताना दिसते.

या शिवाय उल्हासिनी कांबळे, आशा थोरात, सिसिलिया कार्व्हालो, धम्मजोती कांबळे, गिपल गिमेकर, मीना गजभिये, प्रा. प्रज्ञा बडोले, सुषमा अंधारे, मल्लिका शेख इ. व अन्य कवयित्रीनी कवितेच्या प्रांतात आपला वेगळा ठसा उमटवला आहे.

### ४) धम्मपाल रत्नाकर यांची कविता :

तिसऱ्या पिढीतील एक दर्जेदार कवी म्हणून धम्मपाल रत्नाकर यांचा उल्लेख करता येईल. त्यांचे 'हॉटेल माझा देश' (६ डिसेंबर, १९९२) व 'लक्तरांची गझल' (६ डिसेंबर, १९९४), 'सैतानाच्या खांबावर' (६ डिसेंबर, २००३). हे कवितासंग्रह प्रकाशित आहेत. तिसऱ्या पिढीचे नेतृत्व करणारी धम्मपाल रत्नाकर यांची कविता ही दलित जाणिवेच्याही पुढे गेलेली आहे. तिचा केंद्रबिंदू 'माणूस' आहे. म्हणून खऱ्या अर्थाने म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या तत्त्वज्ञानाला पचवून ती बुद्धत्वाकडे निघालेली आहे. म्हणून ही कविता फुले-आंबेडकरी प्रेरणेची कविता आहे. कवी धम्मपाल यांची कविता ही दुसऱ्या पिढीतील दलित कवितेसारखी आक्रमक विद्रोह पुकारत नाही. तर या कवितेतील विद्रोह हा चिंतनाच्या पातळीवर आत्मभान शोधत येतो. त्यामुळे तो जहाल वाटत नसला तरी त्यांची तीव्रता कमी आहे असे नाही. जिथं माणूस केंद्रवर्ती आहे असे समतेचे जग प्रस्तापिण्यासाठी धम्मपाल यांची कविता येते. जे वाईट आहे त्याला कायमची श्रद्धांजली देऊन नविनतेच्या स्वागतासाठी ही सर्जनशील मने तयार झालेली आहेत. समाजात माजलेली दुफळी, आपल्याच नेत्यांच्याकडून

आपल्याच लोकांची होणारी फसवणूक, चळवळीची झालेली दुर्दशा, सत्तेच्या खूर्चीखाली चिरडली जाणारी निरापराध दिन, दुबळी माणसे यावर ही कविता भाष्य करते. म्हणजे तिचा केंद्रबिंदू हा शोषित माणूस आहे. ती इथल्या फसव्या व्यवस्थेवर प्रहार करते, तिच्या विरोधात आवाज उठवते. विद्रोह करते. मात्र हा विद्रोह उरबडवा नाही. तो आत्मचिंतनाच्या स्वरूपात येतो. त्यामुळे तो अधिक दाहक वाटतो. समतेचे नवे फसवे रूप ही कविता उघडे पाडते. एकूणच काय तर तिसऱ्या पिढीची कविता ही दलित जाणिवेच्या पुढच्या टप्प्यावर पोहोचलेली आहे. धम्मपाल रत्नाकरांची कविता या सर्व वैशिष्ट्यांसह येते. नव्या माणसाच्या व त्याच्या नव्या जगाच्या स्वागतासाठी ती सज्ज होते. म्हणून तिसऱ्या पिढीच्या कवितेचे नेतृत्व करण्याचे या कवितेत सामर्थ्य आहे.

## सारांश :

१९६० नंतर मराठी साहित्याच्या प्रांतात 'दलित साहित्य' हा आगळा वेगळा प्रवाह आला आणि एकूण मराठी साहित्याचा चेहरामोहराच बदलून गेला. म. फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांची प्रेरणा घेऊन दलित साहित्य आपली वाटचाल करताना दिसून येते. या प्रवाहात कथा, कादंबरी, कविता, नाटक, आत्मकथन, वैचारिक, समीक्षात्मक लेखन असा मोठा प्रदिर्घ प्रवास झालेला आहे. त्यामध्ये प्रथम काव्याच्या रूपाने हा प्रवाह आकारास आला, या कवितेनेच एकूण दलित साहित्याला विद्रोही रूप दिले. इथल्या अन्यायी व्यवस्थेला विरोध करण्याचे धाडसही या कवितेनेच प्रथम केले.

दलित कवितेला प्रारंभीच्या काळात शाहिरीची महत्त्वाची परंपरा लाभली आहे. सुरवातीच्या काळात दलित शाहिरीनेच विद्रोहाचे बीजारोपण केले. शाहिर भाऊ फक्कड, गोपाळबाबा वलंगकर, भीमराव कर्डक, शाहिर घेगडे आदींच्या शाहिरीतून ज्वलजहाल विद्रोह अवतरलेला दिसतो. पुढे स्वातंत्र्योत्तर काळात याच शाहिरांचा वारसा घेऊन दलित कविता विद्रोहाचा धगधगता अंगार घेऊन आली. शाहिरांच्या पहिल्या पिढीनंतर स्वातंत्र्योत्तर काळात दलित कवींची दुसरी पिढी उदयाला आली. ती प्रामुख्याने नामदेव ढसाळ, केशव मेश्राम, यशवंत मनोहर आदी कवींनी व्यवस्थेच्या विरोधात प्रखर लेखन केले. इथल्या कुचकामी धर्मव्यवस्थेवर, संस्कृतीवर व शोषण व्यवस्थेवर या कवितेने हल्ला चढविला. समता, स्वातंत्र्य बंधुता या त्रिमितीचा अंगीकार करून या कवितेने विद्रोही रूप धारण केले. दुसऱ्या पिढीच्या कवितेला विद्रोहाची पार्श्वभूमी आहे. मात्र

तिसऱ्या पिढीतील कवींचा विचार करता यामध्ये, भुजंग मेश्राम, वाहरु सोनावणे, लोकनाथ यशवंत, अरूण काळे, लहु कानडे, दीपक त्रिभुवन्न, कृष्णा निर्मळे, विनोद कांबळे, डी.बी. रत्नाकर आदी कवींची कविता प्रामुख्याने येते. या पिढीची कविता ही पहिल्या आणि दुसऱ्या पिढीच्या कवितेपेक्षा वेगळी वाट चोखाळताना दिसते. या कवितेचा केंद्रबिंदू 'माणूस' असून विश्वमानव्याची, विश्वबंधुत्वाची संकल्पना घेऊन ही कविता आलेली आहे. ती जशी इथल्या व्यवस्थेविरोधात बोलते. तशी ती आत्मपरिक्षणही करते. या पिढीच्या कवितेतील विद्रोह उरबडवा नाही. डॉ. बाबासाहेबाचे विचार आत्मसात करून ही कविता बुद्धत्वाकडे चाललेली आहे. नवनव्या संकल्पनांचा स्वीकार ती करताना दिसते. आपल्याच लोकांनी केलेल्या लबाडीवर ती भाष्य करते.

दलित कवितेच्या प्रांतात पुरुषांप्रमाणे स्त्रियांनीही काव्यलेखन करून हा प्रांत समृद्ध केलेला आहे. यात, हिरा बनसोडे, ज्योती लांजेवार, सुगंधा शेंडे, सुरेखा भगत, प्रज्ञा लोखंडे, मीना गजभिये, प्रतिभा राजानंद, कुंदा गायकवाड, कुमुद पावडे, धम्मजोती कांबळे, सुषमा अंधारे, सिसिलिया कार्व्हालो, संध्या रंगारी आदींचा समावेश होतो. ज्या दलित जाणिवेतून दलित कवी लेखन करीत होते. त्याच पण दुहेरी जाणिवेतून या कवयित्रींनी लेखन केलेले आहे. एक जन्माने दलित असल्याने व दुसरी दलित असून स्त्री असल्याने सोसाव्या लागणाऱ्या यातना आहेत त्याला शब्दरूप या कवयित्रींची कविता देते.

धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक सर्वच पातळ्यांवर स्त्रीचे शोषण करणारी व्यवस्था आहे. या व्यवस्थेच्या विरोधातील चीड या कवितेत येते. पुरुषप्रधान संस्कृतीतील स्त्री हे एक भोग साधन आहे. या कल्पनेवर ही कविता प्रहार करते. क्रांती जोती सावित्रीबाई फुले यांनी स्त्रीमुक्तीसाठी केलेले मूलभूत कार्य आणि बाबासाहेबानी घटनेच्या रूपाने मिळवून दिलेली स्त्री स्वातंत्र्याची सनद, तो स्त्रीमुक्तीचा जाहीरनामा यांच्या प्रेरणेतून या दलित कवयित्री लिहू लागल्या.

एकंदरीत फुले-आंबेडकरी प्रेरणेतून साकार झालेल्या या स्त्रीवादी आविष्काराचे दलित कवितेत मौलिक योगदान आहे. या कवितेने स्त्रीत्वाचे जिवंत चित्रण केलेले आहे. स्त्रीकडे भोगदासी म्हणून पाहणाऱ्या व पुरुषप्रधान शोषिकतेचे धिटाईने चित्रण या कवितेत आलेले आहे. एकूणच दलित कविता ही शाहिरीपासून ते आजपर्यंत प्रगल्भ अवस्थेत येऊन पोहोचलेली आहे.

यावरील प्रदिर्घ विवेचनावरून काही महत्त्वाचे निष्कर्ष हाती लागतात ते खालीलप्रमाणे-

**निष्कर्ष :**

१) दलित कवितेला शाहिरीची प्रगल्भ अशी परंपरा लाभलेली आहे.

२) पारंपरिक व्यवस्थेवर विद्रोहाचा प्रथम प्रहार करण्याचे काम या शाहिरी कवितेने केलेले आहे.

३) प्रथम म.फुले यांच्या विचार प्रेरणेतून निर्माण झालेल्या सत्यशोधकी शाहिरीने या व्यवस्थेविरोधी विद्रोह पुकारला.

४) शाहिरी परंपरा मागे घेऊन स्वातंत्र्योत्तर काळातील दलित कविता निर्माण झाली.

५) दुसऱ्या पिढीच्या कवितेने जहाल विद्रोहाचा आविष्कार केला.

६) तिसऱ्या पिढीची कविता ही आत्मचिंतनातून आलेली आहे. या पिढीच्या कवितेत विद्रोहाची धार बोथट होऊन त्याला विचारगर्भता लाभली.

७) दुसऱ्या पिढीची कविता जशी व्यवस्थेविरोधी बोलते तशी ती आत्मपरीक्षण ही करिते.

८) संधीसाधुपणा, फसवेपणा यावर प्रहार करून तिसऱ्या पिढीची कविता विश्वमानव्याची संकल्पना मांडते.

९) दलित कवितेमध्ये स्त्रियांची कविता ही तितकीच महत्त्वाची आहे.

१०) स्त्री म्हणून असणारी जाणिव व दलित अशी दुहेरी स्वरूपाचा आशय घेऊन स्त्रियांची कविता येते.

११) तिसऱ्या पिढीची कविताही आंबेडकरी प्रेरणेची दलित कविता आहे. कारण बौद्ध संस्कृतीतले संदर्भ शोधत ती आंबेडकरी विचारधारेला अपेक्षित असलेली मूल्यव्यवस्था निर्माण करू पाहतेय.

-----

14760

A

# संदर्भ


१) कुंभोजकर ललिता : 'दलित कविता एक दर्शन', प्रस्तावना - भालचंद्र फडके, प्रतिमा प्रकाशन, पुणे, १९८४.

२) जाधव रा.ग., : 'निळी पहाट', श्री विद्या प्रकाशन, पुणे, १९७८, पृ.क्र.४४.

३) खंडेराव हरीश : 'आंबेडकरी कवितेचे अंतरंग', जागर प्रकाशन, मुंबई,प्र.आ. १९८१, पृ.क्र.३८.

४) किरवले कृष्णा : 'समग्र लेखक बाबुराव बागूल', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रस्तावना, पृ.क्र. १३, प्र.आ. २००२.

५) किरवले कृष्णा : 'समग्र लेखक बाबुराव बागूल', प्रतिमा प्रकाशन, पुणे, प्रस्तावना, पृ.क्र. १४, प्र.आ. २००२.

६) किरवले कृष्णा : उनि, पृ.क्र. १५.

७) किरवले कृष्णा : उनि, पृ.क्र. १५.

८) किरवले कृष्णा : उनि, पृ.क्र. १६, १७.

९) किरवले कृष्णा : 'दलित चळवळ आणि साहित्य', मॅजिक प्रकाशन, पुणे, प्र.आ., १९९६, पृ.क्र. ७७.

१०) बागूल बाबुराव : 'दलित साहित्य आजचे क्रांती विज्ञान',पृ.क्र.१८२-८३.

११) पवार दया : 'कोंडवाडा', मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८२, 'हे महाकवे' (कविता).

१२) सुर्वे नारायण : 'ऐसा गा मी ब्रम्ह', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, द्वि.आ. १९७१, (चारशब्द, कविता,

१३) सुर्वे नारायण : 'जाहीरनामा', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९६६, एका नव्या संघर्षात (कविता)

१४) फडके भालचंद्र : 'दलित साहित्य वेदना विद्रोह', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७७.

१५) ढसाळ नामदेव : 'गोलपीठा', निलकंठ प्रकाशन, पुणे, द्वि.आ. १९९५, प्रस्तावना, विजय तेंडूलकर.

१६) ढसाळ नामदेव : उनि, 'हे महाग्यानी लोक' (कविता), पृ.क्र. ३-४.

१७) ढसाळ नामदेव : उनि, 'माण्साने' (कविता).

१८) मेश्राम केशव : 'उत्खनन', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, १९७७, 'एक दिवस मी परमेश्वराला' (कविता), पृ.क्र. ७४.

१९) पवार दया : 'कोंडवाडा', मेहता प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९८२, रक्तात पेरुन गेलेला (कविता), पृ.क्र. २४.

२०) निंबाळकर वामन : 'गावकुसाबाहेरील कविता', प्रबोधन प्रकाशन, नागपूर, 'शब्द' (कविता), पृ.क्र. २.

२१) सपकाळे त्र्यंबक : 'सुरुंग', अस्मितादर्श प्रकाशन, औरंगाबाद, प्र.आ. १९७६, पृ.क्र. १.

२२) चेंदवणकर प्रल्हाद : 'ऑडिट', अभिनव प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९७६, 'मी आणि कामगार' (कविता), पृ.क्र. ५०.

२३) पवार ज.वि. : 'नाकेबंदी',जयभारत प्रकाशन,मुंबई,१९७६,पृ.क्र. ४६.

२४) डांगळे अर्जुन : 'छावणी हालती आहे', कर्मवीर प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९७७, 'भुके कंगालांचा जुलूस' (कविता), पृ.क्र. ४३.

२५) मनोहर यशवंत : 'उत्थान गुंफा', कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९७७, 'उत्थान गुंफा' (कविता), पृ.क्र. ४२.

२६) जाधव रा.ग. : 'निळी पहाट', श्रीविद्या प्रकाशन, पुणे, (१९७८), पृ.क्र. १५३.

२७) यशवंत लोकनाथ : 'आणि शेवटी काय झाले', यमक प्रकाशन, चंद्रपूर, १९९५, (आरंभ) (कविता),

२८) यशवंत लोकनाथ : उनि. 'पलायन' (कविता).

२९) भवरे महेंद्र : 'दलित कवितेतील नवे प्रवाह', शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, प्र.आ. २००१, पृ.क्र. ६१.

३०) मेश्राम भुजंग : 'ऊलगुलान', साकेत प्रकाशन, औरंगाबाद, द्वि.आ. १९९५, पृ.क्र.८५.

३१) सोनवणे वाहरू : 'गोधड',रविराज प्रकाशन,पुणे, प्र.आ. १९८७, 'स्टेज' (कविता), पृ.क्र. ४७.

३२) काळे अरूण : 'सायरनचे शहर', सत्यजित प्रकाशन, नाशिक, १९९७, पृ.क्र. १८.

३३) त्रिभुवन दीपक : 'खोल खदानी', मधुश्री प्रकाशन, पुणे, प्र.आ. १९९२.
३४) पिंपळापुरे केतन : 'सूर्यकंकण', प्र.आ. १९९५.
३५) पिंपळापुरे केतर : 'सूर्यकंकण', प्र.आ. १९९५.
३६) कानडे लहू : 'टाचाटिभा', सुगावा प्रकाशन, पुणे, द्वि.आ. १९९७, पृ.क्र. १४.
३७) कुरेशी जावेद : 'बएत', सुगावा प्रकाशन, पुणे, पृ.क्र. ४६.
३८) सरकुंडे माधव : 'मनोगत', देवयानी प्रकाशन, यवतमाळ, प्र.आ. १९९७, पृ.क्र. ४२.
३९) निर्मळे कृष्णा : 'पाणुता', संस्करण प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. २००३, पाणुत्यास (कविता), पृ.क्र. ९२.
४०) निर्मळे कृष्णा : 'येस', संस्करण प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. २००५, पृ.क्र. ७१
४१) कांबळे विनोद : 'चव', २००२.
४२) लांजेवार ज्योती : 'दिशा', निखिल प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९८२, 'कुरूक्षेत्र' (कविता).
४३) भगत सुरेखा : 'साक्ष', 'सिंहगर्जना', दिवाळी अंक १९८०, 'आजपासूनच' (कविता).
४४) लांजेवार ज्योती : 'दलितकवयित्रींची कविता', सुगावा, डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रेरणा विशेषांक, १९९३, पृ.क्र. ९०.
४५) प्रज्ञा लोखंडे : 'आंबेडकरवादी मराठी साहित्य', डॉ. यशवंत मनोहर, भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९१, पृ.क्र. १९३ मधून उद्धृत.
४६) राजानंद प्रतिमा : 'मला हवी असणारी पहाट' (कविता संग्रह), यशवंत मनोहर, 'आंबेडकरवादी साहित्य', भीमरत्न प्रकाशन, नागपूर, प्र.आ. १९९१, पृ.क्र. १९५, वरून उद्धृत.
४७) अलाम कुसूम : 'रान आसवांचे तळे', (१९९८),आंबेडकरी कवितेचे अंतरंग, हरीश खंडेराव, जागर प्रकाशन, मुंबई, प्र.आ. १९८१, पृ.क्र. २०० वरून उद्धृत.
४८) पावडे कुमुद : 'अंत:स्फोट', आनंद प्रकाशन, औरंगाबद, प्र.आ., १९८०.